# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 19 January 2026

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १९ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल – एनडीआरएफचा स्थापना दिवस आज साजरा होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त या दलाच्या व्यावसायिकता, समर्पण आणि आपत्ती प्रतिसादातील धैर्याचं कौतुक केलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देखील एनडीआरएफला शुभेच्छा दिल्या आहेत. आपत्तीदरम्यान एनडीआरएफ हा देशाचा आधारस्तंभ असून, आपत्ती–प्रतिरोधक राष्ट्र निर्माण करण्याच्या सरकारच्या संकल्पाला साकार करण्यात हा प्रतिसाद दल महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं शहा यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

उत्तर प्रदेश विधानसभा मध्ये आजपासून ८६व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेला सुरुवात होत आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला उद्घाटन सत्राला संबोधित करणार आहेत. या परिषदेदरम्यान पीठासीन अधिकारी, सचिव आणि इतर प्रतिनिधी विधी प्रक्रिया, सभागृहाचे संचालन तसंच सध्याच्या विधी विषयांवर चर्चा करणार आहेत.

****

स्वित्झर्लंडमधल्या दावोस इथं आजपासून जागतिक आर्थिक मंचाच्या ५६व्या वार्षिक संमेलनाला सुरुवात होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या परिषदेत सहभागी होत आहेत. जागतिक नेते, उद्योगसमूह, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी संवाद साधत महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी संकल्पना आणि संधी मांडण्याची ही महत्त्वाची संधी असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ‘मॅग्नेटिक महाराष्ट्र’ला जागतिक विकास इंजिन म्हणून अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करत, महाराष्ट्राची एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल वेगवान करण्यासाठी ही परिषद निर्णायक ठरेल, असंही त्यांनी नमूद केलं. गेल्या वर्षी १६ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार झाले असून, यंदा त्याहून अधिक गुंतवणूक आणण्याचं उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे.

****

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. दुपारी दोन ते चार वाजेपर्यंत अर्ज भरता येतील असं पक्षाचे निवडणूक निर्णय अधिकारी के लक्ष्मण यांनी सांगितलं. दुपारी चार ते पाच या दरम्यान अर्जांची छाननी होईल. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील, आणि अध्यक्षपदासाठी २० जानेवारीला मतदान होणार आहे.

****

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बजाज पुणे ग्रँड टूर, या सायकल स्पर्धेचा थरार आजपासून पुणे जिल्ह्यात रंगणार आहे. जगभरातल्या ३५ देशांमधल्या २९ संघांचे १७१ आघाडीचे सायकलपटू यात भाग घेणार आहेत. पुणे जिल्हा प्रशासन आणि राज्य सरकारनं, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचं आयोजन केलं आहे. स्पर्धेचा पहिला टप्पा आज दुपारी पुण्यातील गुडलक चौकातून सुरू होईल; आणि नऊ तालुक्यांमधून आणि १५० गावांतून सायकलपटू मार्गक्रमण करत, येत्या २१ तारखेला, पुण्यातील डेक्कन जिमखाना बस स्थानकावर या टप्प्याचा समारोप होणार आहे. ४३७ किलोमीटरच्या या सायकल शर्यतीसाठी अद्ययावत रस्ते, सुरक्षा यंत्रणा, आणि सर्व आवश्यक सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत.

****

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विधान परिषदेचे आमदार संदीप जोशी यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्तीचा निर्णय जाहीर केला आहे. सध्याची राजकीय संस्कृती, पक्षांतर आणि निष्ठावान कार्यकर्त्यांवरील अन्यायाबाबत त्यांनी स्पष्ट भूमिका मांडली. १३ मे रोजी आमदारकीची मुदत पूर्ण झाल्यानंतर कोणतेही पद स्वीकारणार नसल्याचं त्यांनी जाहीर केलं. संपूर्ण भूमिका आणि निर्णयाचं कारण स्पष्ट करणारं भावनिक पत्र त्यांनी प्रसारित केलं.

****

मुंबईचा महापौर महायुतीचाच होईल, असा स्पष्ट आणि ठाम दावा शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. मुंबईतल्या नवनिर्वाचित नगरसेवकांना मार्गदर्शन केल्यानंतर ते काल माध्यमांशी बोलत होते. नगरसेवकांना मार्गदर्शनासाठी एकत्र ठेवण्यात कोणताही वेगळा हेतू नाही, त्याचा गैरअर्थ काढू नये, असंही शिंदे यांनी स्पष्ट केलं.

****

पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकांमध्येही आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस-अजित पवार गटाबरोबर एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी काल स्पष्ट केलं. महापालिका निवडणूक निकालांच्या पार्श्वभूमीवर ते बारामतीत पत्रकारांशी बोलत होते.

****

माहिती आयोगात दाखल प्रकरणांचा गतीने निपटारा करण्यात छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. २०२४ मध्ये खंडपीठाने १४ हजार तर २०२५ मध्ये १० हजार ७८३ द्वितीय अपिलांचा निपटारा केला. आयोगाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या निपटाऱ्याच्या प्रमाणात जवळपास दहापटीने वाढ झाली असून, द्वितीय अपिलांच्या प्रलंबिततेत सुमारे ५५ टक्क्यांची लक्षणीय घट झाली आहे. नियोजनबद्ध कामकाज, सुनावणीतील शिस्त आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे प्रलंबित अपिले आणि तक्रारींच्या निपटाऱ्यात लक्षणीय प्रगती साधता आल्याचं राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर यांनी सांगितलं.

****

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कुंभमेळा प्राधिकरणानं मंजुरी दिल्यानंतर त्र्यंबकेश्वर पालिकेनं दहा आखाड्यांमध्ये पायाभूत सुविधा उभारण्यासाठी ७ कोटी ५५ लाख रुपयांच्या निविदा मागवल्या आहेत.

****